# उस्मानाबाद जनता सहकारी बँक लि., उस्मानाबाद

मुख्य कार्यालय: सोलापूर रोड, उस्मानाबाद – ४१३५०१ (महाराष्ट्र राज्य) (मल्टीस्टेट बँक)

———————————————————————————————————————————

**परीक्षा कोड क्र. १२०/२०२४-२५**

महाराष्ट्र राज्यातील **धाराशिव** जिल्ह्यातील अग्रगण्य असलेल्या **उस्मानाबाद जनता सहकारी बँक लि., उस्मानाबाद** या बहुराज्यीय सहकारी बँकेमध्ये **'कनिष्ठ लिपिक'** या पदाकरिता दि महाराष्ट्र अर्बन को-ऑप.बँक्स् फेडरेशन लि., मुंबई यांचे माध्यमातून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत. सदर जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून इच्छुक उमेद्वारांनी आपले अर्ज ऑनलाईन पद्धतीने दि. ०६/०९/२०२४ रोजी सकाळी ११.०० वा. पासून ते २०/०९/२०२४ रोजी रात्री ११.५९ वाजेपर्यंत भरुन पाठवावेत. पदाचा तपशील आाणि महत्वाच्या सूचना खालीलप्रमाणे आहेत:

| अ.क्र. | तपशिल | दिनांक |
|---|---|---|
| १ | ऑनलाईन पद्धतीने अर्ज करण्याचा कालावधी | दि. ०६/०९/२०२४ सकाळी ११.०० पासून ते दि. २०/०९/२०२४ रात्री ११.५९ वाजेपर्यंत. |
| २ | परीक्षा शुल्क ऑनलाईन पद्धतीने भरण्याचा व संकेतस्थळावर अद्ययावत करण्याचा अंतिम दिनांक व वेळ | दि. २०/०९/२०२४ रात्री ११.५९ वाजेपर्यंत. |
| ३ | परीक्षा दिनांक | ऑक्टोबर ०६, २०२४ |
| ४ | परीक्षा प्रवेशपत्र डाऊनलोड करण्याचा दिनांक | http://www.mucbf.in/ संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. |
| ५ | मुलाखत दिनांक | http://www.mucbf.in/ संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. |

## महत्वाच्या सूचना

१) परीक्षा शुल्क संकेतस्थळावर अद्ययावत केल्याशिवाय रजिस्ट्रेशन प्रक्रिया पूर्ण होणार नाही.

२) उमेद्वाराकडे वैध ई-मेल आयडी व मोबाईल क्रमांक असावा, जो निवड प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वैध आणि सक्रिय राहिला पाहिजे. तसेच मोबाईल क्रमांक NCPR रजिस्टर (DND) असल्यामुळे संपूर्ण प्रक्रियेदरम्यान त्याद्वारे पाठविल्या जाणाऱ्या सुचना, संदेश व माहिती उमेद्वारांना प्राप्त न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी उमेद्वाराची राहिल. तसेच ई-मेल आय.डी. व संदेशवहनात येणाऱ्या तांत्रिक अडचणींना फेडरेशन व बँक जबाबदार राहणार नाही. सदर भरती प्रक्रियेदरम्यान फेडरेशनच्या संकेतस्थळावर वेळोवेळी अवलोकन करुन भरतीप्रक्रियेची अद्ययावत माहिती प्राप्त करण्याची जबाबदारी उमेद्वाराची राहील.

३) उमेद्वारांनी अर्ज भरताना सदर पदासाठी आवश्यक पात्रता धारक असल्याची खात्री करुनच अर्ज भरावा. उमेद्वारांचे अर्ज ऑनलाईन पद्धतीने स्वीकारण्यात येणार असल्याने अर्ज करताना शैक्षणिक कागदपत्रके, अन्य प्रमाणपत्रके व पुरावे जोडणे आवश्यक नाही. तथापि ऑनलाईन अर्जामध्ये उमेद्वाराने त्याचे पात्रतेनुसार

काळजीपूर्वक संपूर्ण व खरी माहिती भरणे आवश्यक राहील. ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरताना काही चुका झाल्यास किंवा त्रुटी राहिल्यास भरतीच्या कुठल्याही टप्प्यावर अर्ज नाकारला गेल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित उमेद्वाराची राहील व याबाबत उमेद्वारास कोठेही व कोणत्याही प्रकारे तक्रार करता येणार नाही. ऑनलाईन अर्जात भरलेली माहिती अर्ज सादर केल्यावर बदलता येणार नाही.

४) सदर भरती प्रक्रियेदरम्यान संकेतस्थळावर असलेल्या सूचनांचे वेळोवेळी अवलोकन व पालन करुन भरती प्रक्रियेची अद्ययावत माहिती प्राप्त करण्याची जबाबदारी उमेद्वाराची राहील.

५) इच्छुक उमेदवारांनी अर्जातील माहिती पूर्ण भरुन वैध ई-मेल अॅड्रेससह जाहिरात प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून १५ दिवसांत सदर अर्जाची ऑनलाईन पद्धतीने दि. २०/०९/२०२४ पर्यंत रात्री ११:५९ वाजेपर्यंत नोंदणी करावी. त्यानंतर आलेल्या अथवा अर्जासोबत परीक्षा शुल्क न भरणाऱ्या अर्जांचा विचार केला जाणार नाही. उमेद्वारांची १०० गुणांची बहुपर्यायी प्रश्नांची ऑफलाईन पद्धतीने परीक्षा घेण्यात येईल.

६) उमेद्वाराची बहुपर्यायी प्रश्नांची परीक्षा ही ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या पात्रतेनुसार कोणत्याही कागदपत्रकांची पूर्व तपासणी/छाननी न करता घेण्यात येणार असल्याने, या परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे उमेद्वारांना निवडीबाबत कोणताही हक्क राहणार नाही. कागदपत्रकांच्या पूर्ण छाननी व तपासणीनंतरच त्यांची वैधता पाहून उमेद्वाराची पात्रता निश्चित करण्यात येईल. सदर छाननी प्रक्रियेत उमेद्वार कोणत्याही टप्प्यावर अपात्र आढळल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यात येईल. पात्रता धारण न करणाऱ्या उमेद्वारांना भरतीच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्याचे संपूर्ण अधिकार फेडरेशनने व संबंधित बँकेने राखून ठेवलेले आहेत व याबाबत उमेद्वारांना मागाहून कोणतीही तक्रार करता येणार नाही.

७) उमेद्वारांना ऑफलाईन परीक्षा/कागदपत्रके पडताळणी व प्रत्यक्ष मुलाखतीस स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

८) परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेद्वारांची मुलाखतीद्वारे निवड केली जाईल.

९) परीक्षेचे ठिकाण व दिनांक, परीक्षेचे स्वरुप इ. बाबतची माहिती पात्र उमेद्वारांना फेडरेशनच्या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

१०) मुलाखतीचे वेळापत्रक उमेद्वारांना फेडरेशनच्या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

११) उमेद्वाराने अर्जात नमूद केलेली सर्व माहिती व तपशील अचूक असावा. सदर माहिती अथवा तपशील चूकीचा अथवा खोटा आढळल्यास सदर उमेद्वाराचा अर्ज कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय वा भरपाईशिवाय नोकरभरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

१२) भरती प्रक्रियेत/निवड कार्यपद्धतीत बदल करण्याचा अधिकार फेडरेशनला व संबंधित बँकेस असेल व ऐनवेळी त्यात काही बदल झाल्यास तो फेडरेशनच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केला जाईल. याबाबत अर्ज केलेल्या उमेद्वारांना कोणत्याही स्वरुपात कळविले जाणार नाही.

१३) सदर जाहिरातीमध्ये नमूद पदांची संख्या बँकेच्या आवश्यकतेनुसार कमी/जास्त होऊ शकते. नोकरभरतीविषयक सर्वाधिकार फेडरेशन व संबंधित बँक राखून ठेवत असून संपूर्ण अथवा अंशत: भरती प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकारदेखील फेडरेशन व संबंधित बँक राखून ठेवत आहे.

१४) उमेद्वाराने अर्ज अपूर्ण भरल्यास अथवा विहित कालावधीत भरुन न पाठविल्यास सदर उमेद्वार परीक्षेस अपात्र राहील. तसेच त्याला/तिला कोणत्याही प्रकारे परीक्षा शुल्काची रक्कम परत केली जाणार नाही.

१५) कनिष्ठ लिपिक परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या व मुलाखत घेतलेल्या पात्र उमेद्वारांना रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर **०२** वर्षाचा बॉण्ड तसेच **रु. १,००,०००/-** इतकी रक्कम सिक्युरिटी डिपॉझिट म्हणून संबंधित बँकेत जमा करावी लागेल. सदर डिपॉझिटवर संबंधित उमेद्वारास कोणत्याही प्रकारचे व्याज मिळणार नाही. तसेच उमेद्वाराने **०२ वर्षाचे आत** बँकेतील नोकरीचा राजीनामा दिल्यास सदरहू सिक्युरिटी डिपॉझिट जप्त केले जाईल. याची उमेद्वारांनी कृपया नोंद घ्यावी.

१६) पात्र उमेद्वाराने आपले वैद्यकीय प्रमाणपत्र (सिव्हील सर्जन) बँकेत रुजू होतेवेळी सादर करावे.

१७) कनिष्ठ लिपिक पदाच्या भरतीबाबत फेडरेशनची नियुक्ती बँकेने केवळ ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविणे, पात्र उमेद्वारांची यादी बनविणे, हॉल तिकीटे पाठविणे, ऑफलाईन पद्धतीने परीक्षा घेणे, परीक्षेचा निकाल जाहीर करणे व सदर निकाल बँकेला पाठविणे इ. पर्यंतच कामे पार पाडणेकरिता केलेली आहे, याची सर्व उमेद्वारांनी नोंद घ्यावी.

१८) जर एखाद्या परीक्षार्थीची वर्तणूक परीक्षाकक्षात परीक्षा देतेवेळी संशयास्पद आढळल्यास अथवा त्याने गैरमार्गाचा वापर केल्याचे आढळल्यास त्याची फेरपरीक्षा घेण्याचे अथवा त्याच्यावर कठोर कायदेशीर कारवाई करण्याचे अधिकार फेडरेशन राखून ठेवत आहे.

❖ **पदाचे नाव: कनिष्ठ लिपिक**

**एकूण पदे: ५० (पन्नास)**

**नोकरीचे ठिकाण:**

धाराशिव, लातूर, सोलापूर, बीड, अहमदनगर जिल्हा (महाराष्ट्र राज्य) आणि बिदर जिल्हा (कनार्टक राज्य)

**शैक्षणिक अर्हता:**

१. कोणत्याही शाखेतील मान्यताप्राप्त विद्यापिठाची पदवी
२. MS-CIT किंवा समतुल्य संगणक कोर्स प्रमाणपत्र आवश्यक (equivalent certification course)
३. दि. ०६.०९.२०२४ रोजी शैक्षणिक अर्हता प्राप्त असलेले उमेद्वार अर्ज करण्यास पात्र असतील.
४. परीक्षेचा निकाल जर फक्त विद्यापीठाच्या अधिकृत वेबसाईटवर अद्ययावत केला गेला असेल किंवा वेब-आधारित प्रमाणपत्र प्रदान केले गेले असेल, तर उमेद्वाराने त्यासंदर्भात मूळ प्रमाणपत्र बँकेला सादर करणे आवश्यक राहील आणि त्यावर विद्यापीठाच्या अधिकृत अधिकाऱ्याने सदरहू उमेद्वार परीक्षेत उत्तीर्ण झाल्याची तारीख दर्शवून स्वाक्षरी करणे आवश्यक राहील.

**वयोमर्यादा:**

दि. ०६.०९.२०२४ रोजी किमान २२ ते कमाल ३८ वर्षे

**प्राधान्य:**

१. M.Com. / BE Computer / IT / MCA / MBA (Banking & Finance) or (Finance)/JAIIB/CAIIB/GDC&A उत्तीर्ण
   तसेच शासन मान्यता प्राप्त इतर संस्थेची (ICM, IIBF, VAMNICOM इ.) बँकिंग/सहकार/कायदेविषयक पदविका तत्सम इ.
२. बँका/पतसंस्था किंवा इतर वित्तीय संस्थांमधील कामकाजाचा अनुभव असल्यास प्राधान्य.
३. उमेद्वार शक्यतो बँकेच्या कार्यक्षेत्रातील असावा.

**भाषेचे ज्ञान:**

मराठी/इंग्रजी/हिंदी/कन्नड भाषा लिहिण्यामध्ये व बोलण्यामध्ये प्रभुत्व असावे.

**वेतन:**

निवड केलेल्या उमेद्वारास प्रोबेशनरी कालावधी दोन वर्षासाठी रु. १५,०००/- विद्या वेतन दिले जाईल. त्यानंतर त्यांच्या कामकाजाचा आढावा घेऊन सेवानियमानूसार वेतनश्रेणी अदा करण्यात येईल.

**निवड कार्यपद्धती:**

१. **ऑफलाईन परीक्षा :**

   कनिष्ठ लिपिक पदाकरिता १०० गुणांची बहूपर्यायी प्रश्नांची ऑफलाईन पद्धतीने इंग्रजी माध्यमातून परीक्षा घेण्यात येईल. बहुपर्यायी स्वरुपाच्या प्रश्नांमध्ये संख्यात्मक आणि गणिती क्षमता, इंग्रजी भाषा आणि व्याकरण, संगणक आणि सहकार ज्ञान, बौधिक चाचणी, बँकिंग आणि सामान्य ज्ञान या विषयांवरील प्रश्नांचा समावेश असेल. तद्नंतर १०० पैकी प्राप्त गुणांचे ७५ च्या गुणोत्तरामध्ये रुपांतर करण्यात येईल.

२. **कागदपत्रके पडताळणी:**

   उमेद्वारास ऑफलाईन परीक्षेतील गुणांच्या उतरत्या क्रमवारीनुसार बँक धोरणाप्रमाणे मुलाखतीपूर्वी शैक्षणिक व इतर संबंधित मूळ प्रमाणपत्रकांची प्राथमिक कागदपत्रके पडताळणीसाठी बोलविण्यात येईल. त्यावेळी उमेद्वाराने मूळ कागदपत्रके उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. प्राथमिक कागदपत्रके पडताळणीमध्ये पात्र होणाऱ्या उमेद्वारास बँक धोरणाप्रमाणे बँकेकडून मुलाखतीस बोलविण्यात येईल.

३. **मुलाखत:**

   कनिष्ठ लिपिक पदाकरिता उत्तीर्ण होणाऱ्या उमेद्वारांना बँकेच्या धोरणानुसार भरावयाचे पदसंख्येच्या प्रमाणात ऑफलाईन परीक्षेच्या गुणानुक्रमे मौखिक मुलाखतीस बोलविण्यात येईल. मौखिक मुलाखतीकरिता २५ गुण राहतील. मुलाखतीस गैरहजर राहिल्यास संबंधित उमेद्वार अंतिम निवडीस (परीक्षेत उत्तीर्ण झालेला असला तरी) पात्र राहणार नाही.

४. **उमेद्वाराची अंतिम निवड सूची :**

उमेद्वाराचे ऑफलाईन परीक्षेतील गुण अधिक मुलाखतीचे गुण यांची बेरीज करून एकूण १०० गुणांपैकी गुणानुक्रमे अंतिम निवड सूची तयार करण्यात येईल.

**परीक्षा दिनांक** : ऑक्टोबर ०६, २०२४

**परीक्षा शुल्क** :

१. परीक्षा शुल्क रु. ८००/- अधिक १८% जी.एस.टी. असे एकूण रु. ९४४/- (विना परतावा) (Online Payment)
२. उमेद्वारांना अर्ज भरतांना अडचणी/शंका असल्यास संकेतस्थळावर उपलब्ध असणाऱ्या हेल्पलाईन क्रमांकावर संपर्क करुन अडचणी/शंकांचे निरसन करावे.

*****